**महाराष्ट्र शासन**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

**ग्रामपंचायत मांडवगण फराटा ता. शिरूर जि.पुणे**

**ई-निविदा सूचना क्र. २ सन २०२६-२७ (प्रथम वेळ)**

सरपंच ग्रामपंचायत मांडवगण फराटा ता शिरूर हे योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन Percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने पुढील कामाची ई-निविदा मागवित आहेत.

| अ. नं. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | बयाना रक्कम (परतावा) | टेंडर फी रक्कम रु. | आवश्यक ठेकेदार वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **मांडवगण फराटा येथे ग्रामपंचायत इमारत बांधणे** | ३३५२०५८ (GST अतिरिक्त) | ३३५२१ | ११८० | नोंदणीकृत खुला वर्ग | १२ महिने |

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल.सदर निविदेसंदर्भात निविदा नोटीस प्रसिध्दी,सुचना,शुध्दीपत्रके इत्यादीची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) वरिल कामाची निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.सदर निविदा प्रपत्रे,अटी,शर्ती इ.सदर संकेतस्थळावरून **दिनांक-** १८/०५/२०२६ **रोजी** १७.३० **वा. ते दिनांक** २५/०५/२०२६ **चे** १७.०० **वा**. पर्यत अधिग्रहित (Download) करता येतील.

३) वरिल कामाच्या निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दिनांक-** १८/०५/२०२६ **रोजी** १७.३० **वा. ते दिनांक** २५/०५/२०२६ **चे** १७.०० **वा**. इलेक्ट्रॉनिक फॉरमॅटमध्ये ऑनलाईन पध्दतीने सादर करता येतील.

४) ई निविदेमधील अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे. ई-निविदा भरणाऱ्या कोणत्याही ठेकेदारास ई निविदा फेटाळल्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही. तसेच एखाद्या कामाची निकड लक्षात घेता निविदेतील त्या कामासाठी एखादी अट शिथिल करणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

५) निविदा फी व इसारा फी SBI Online व्दारे भरल्याबाबतचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र ( as per part of e tendering document and process) संबधीत SBI Online चा युनिक ट्रान्झेशन रजिस्ट्रेशन क्रमांक (UTR) नोंदवुन तांत्रिक लिफाफयासोबत अपलोड करणेत यावे. ई निविदा मजुर सह.संस्थेसाठी राखीव असल्यास बयाना रक्कमेत संपूर्ण सुट देण्यात येईल.परंतू ई निविदा खुल्या गटाच्या प्रकाराची असेल व ती म.स.सं. अथवा सु.बे.यांनी दाखल केलेस त्यांना बयाना रक्कमेत कोणतीच सूट देय राहणार नाही.

६) ऑनलाईन सादर केलेल्या ई निविदा **दि. २६/०५/२०२६** रोजी १७.०० **वा**. ग्रामपंचायत कार्यालयात उघडणेत येतील. सदर दिवशी ई निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेच्या सोयीनुसार उघडणेत येतील.

**सरपंच**

**ग्रामपंचायत** मांडवगण फराटा

**ता** शिरूर **जि.पुणे**

## ई निविदा संदर्भातील इतर अटी व शर्ती

१) ठेकेदारांनी दोन लिफाफा पध्दतीने ई निविदा सादर करणे गरजेचे आहे.

२) कंत्राटदारांनी कामाचे नकाशे,निविदेतील अटी व शर्ती बाबनिहाय कामाचे स्थळ,मजूर व साहित्याची उपलब्धता या सर्व बाबींचा अभ्यास करून निविदा सादर कराव्यात.

३) लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रांची छानणी करून लिफाफा क्र.१ मध्ये पात्र ठरलेल्या ठेकादारांचाच लिफाफा क्र.२ उघडणेत येईल.

४) कोणत्याही अटींवर आधारित असलेल्या ई निविदा स्विकारल्या जाणार नाहीत अथवा स्विकारल्या तरीही त्या मंजूर केल्या जाणार नाहीत.

५) मक्तेदारांनी सादर केलेली ई निविदा व त्या निविदेमधील दर लिफाफा क्रमांक २ उघडलेनंतर ३६५ दिवसांपर्यत वैध राहतील.(कंत्राटदाराचा देकार **३६५** दिवस राहील.)

६) सदर कामाचा राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयक आदा करणेत येईल.

७) अंदाजपत्रक दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास शासन निर्णय क्रं.बीडीजी २०१६ /प्रक्रं.२ /इमा.२ / मंत्रालयमुंबई ४०००३२ दि.१२.२.२०१६ व जि प स्थायी समिती ठराव क्रं.५७७ दि.७.५.२०१६ **आणि** शासन निर्णय क्रं.**सीएसटी** /२०१७ /प्रक्रं.८ /इमा.२ / मंत्रालयमुंबई ४०००३२ दि.२७.९.२०१८ व शासन निर्णय क्रं.**सीएसटी** /२०१७ /प्रक्रं.८ /इमा.२ / मंत्रालयमुंबई ४०००३२ दि.२६.११.२०१८ नुसार १० टक्के पर्यंत कमीदर भरल्यास १ टक्केविशेष सुरक्षा ठेव तसेच १० टक्क्यांपेक्षा जेवढया दराने कमी आहे त्याच्या प्रत्येक टक्यास १ टक्का (उदा.१४ टक्केकमी दर असलास १० टक्केपर्यत १ टक्का व वरील ४ टक्क्यास ४ टक्के असे एकूण ५ टक्के) रक्कमेची बँक गॅरंटी अथवा धनाकर्ष **सरपंच ग्रामपंचायत** मांडवगण फराटा **ता**.शिरूर यांचे नांवे विशेष सुरक्षा ठेव म्हणून काढणेत यावाव तो सरकारी बँक किंवा शेडयूल बॅकेचा तसेच **शिरूर** येथे देय असलेला असावा धनाक र्षावर MICRव IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे. **लिफाफा क्र.१ व २ उघडल्यानंतर लघुत्तम निविदाधारकाने आठ दिवसाच्या आत ग्रामपंचायत मांडवगण फराटा ता.शिरूर यांचे कार्यालयात सदरचा धनाकर्ष अथवा बँक गॅरंटी समक्ष लिफाफ्यामध्ये सिलबंद करून जमा करावा**.सदर लिफाफ्यावर कामाचे नाव,ठेकेदाराचे नाव,ठेकेदाराचा पूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक नोंद करावा.विहीत मुदतीत ज्या ठेकेदारांचा धनाकर्ष अथवा बँक गॅरंटी कार्यालयास प्राप्त होणार नाही अथवा चुकिचा धनाकर्ष अथवा बँक गॅरंटी जमा केलेस अशा ठेकेदारांची भरलेली ई निविदा नामंजूर करणेत येईल. तसेच धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ३ महिने पर्यत असणे आवश्यक आहे.तसेच सदरचा धनाकर्ष हा ई निविदा प्रसिध्द झालेल्या दिनांकाचा अथवा निविदा **समाप्ती** झालेल्या दिनांकाचा असावा.

८) १ जुलै २०१७ नंतर शासनाने शासकिय कंत्राटावर जीएसटी कर लागू केलेला असल्याने सदर निविदा रकमेवर नियमाप्रमाणे जीएसटी कराची आकारणी केली जाणार आहे.त्यामुळे सदर निविदेचे दर नमुद करताना कंत्राटदार यांनी जीएसटी चा विचार करुन निविदेचे दर नोंद करावेत. तसेच कामाचे देयक आदा करताना शासकिय नियमाप्रमाणे कपात कराव्या लागणाऱ्या सर्व रक्कमा नियमप्रमाणे कपात करणेत येतील.

९) निविदेमधील सर्व वा कोणतेही अटी व शर्ती पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदाराची निविदा वा अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील.

१०) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.पसस/१००१/प्र.क्र.४०/जल ३ /दिनांक १९/१०/२००१ अन्वये मक्तेदाराकडून वसूल केलेली ५ टक्के इतकी रक्कम दोष दायित्व कालावधीसाठी १ वर्ष ग्रामपंचायतीकडे राखून ठेवणेत येईल.सदरचा दोष दायित्व कालावधी समाप्तीनंतरच मक्तेदारास परत केली जाईल तसेच सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज ग्रामपंचायतकडून देय असणार नाही.

११)सदरच्या निविदा नोटीसमधील अटी व शर्तीशिवाय इतर आवश्यक त्या अटी व शर्तीचा समावेश प्रत्यक्ष करारनामा करताना करणेत येईल.

१२) सदर ई निविदेबाबत कोणताही तंटा अगर वाद निर्माण झाल्यास त्याबाबत कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.याबाबत ग्रामपंचायतीचा निर्णय अंतीम राहील.

१३)ई निविदा संदर्भातील जमा झालेली १ टक्के बयाना रक्कम ज्याची ई निविदा मंजूर होईल त्यास काम सुरू झाल्यानंतर परत दिली जाईल व ज्यांची ई निविदा नामंजूर होईल त्यांनी ग्रामपंचायतीकडे बयाना रक्कम मागणी करणे गरजेचे नाही त्यांची बयाना रक्कम त्यांनी ज्या बँक खातेवरून ऑनलाईन भरणा केली आहे त्याच बँक खात्यामध्ये आपोआप जमा होईल.

१४)ई निविदा प्रक्रियेसंदर्भात संगणकीकृत ई प्रणालीव्दारे भ्रमणध्वनीवर संदेश पाठविला जातो.तसेच काही वेळा संदेश प्राप्त झाला नाही तरीही ऑनलाईन ई निविदा कार्यवाही प्रक्रिया पाहणेची जबाबदारी संबधीत निविदाधारकाची राहिल.याबाबत या कार्यालयाकडून स्वतंत्रपणे कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५)ई निविदेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा निविदा मंजूरीनंतर कामाच्या कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रांच्या विधीग्राहयतेबाबत आक्षेप नोंदविला गेला तर हि बाब कायदेशीर अथवा फौजदारी कार्यवाहीस पात्र राहिल.

१६)मक्तेदारावर सोपविलेल्या कंत्राटकामाचा विमा कंत्राटदारांनी विमा संचालनालय,महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण भवन २६४,पहिला मजला,कलानगर,बांद्रा (पुर्व) मुंबई ४०००५१ (दुरध्वनी क्रमांक संचालक २६५९१७८२/२६५९०४०३ कार्यालय २६५९०६०९/२६५९०७४६ फॅक्स क्र.०२२- ६५९०२४६१) या कार्यालयापाशी कंत्राटाचा संपूर्ण विमा उतरविणे बंधनकारक आहे.तसेच सदरचे कंत्राटी काम पूर्ण करण्यासाठी नियुक्त करणेत येत असलेल्या सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमापत्राखाली,अटी व शर्तीनुसार उतरविणे अनिवार्य आहे.विमा संचालनालयाच्या व्यतिरिक्त अन्य विमा कंपन्याकडून घेतलेली विमापत्रे स्विकारली जाणार नाहीत.

१७)जे कंत्राटदार कंत्राटी कामाचा विमा उपरोक्त कार्यालयाकडुन घेणार नाहीत तसेच या कार्यालयास विमा पॉलिसी घेतल्याचा पुरावा सादर करणार नाहीत किंवा जे कंत्राटदार कार्यारंभ आदेश घेताना कंत्राटी कामाच्या नियमाप्रमाणे ०.५० टक्के अथवा १.०० टक्के रकमेचा धनाकर्ष देउन विमापत्र घेणार नाहीत,अशा कंत्राटदाराच्या प्रथम देयकामधून नियमाप्रमाणे ०.५० टक्के किंवा १.०० टक्के रक्कम विमा हप्ता अथवा किमान विमा हप्ता रु.२२६/- यापैकी जी जास्त असेल ती वसुल करणेत येईल व विमापत्राच्या अटी व शर्तीनुसार उपरोक्त कार्यालयाकडून कार्यवाही करणेत येईल.

मक्तेदारांनी पुढीलप्रमाणे कागदपत्रे लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र.२ मध्ये जोडणी गरजेचे आहे. त्यामध्ये अपूरी अथवा चुकिची कागदपत्रे जोडल्यास निविदाधारकाची निविदा नामंजूर करणेत येईल.

**अ) तांत्रिक लिफाफा /लिफाफा क्र.१**

- निविदा फी व बयाना रक्कम नेट बॅकींगव्दारे भरणा केलेली ऑनलाईनची प्रत
- नोंदणी केलेल्या मक्तेदाराची वैध प्रमाणपत्राची प्रत
- पॅनकार्ड,जी एस टी रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट व आयकर भरलेले प्रमाणपत्र /ऑडिट फाईल
- विहित नमुन्यातील ठेकेदाराचे बंधपत्र (Bidder Decleration)
- स्टेटमेंट नं.१,२,३ आणि ४ आवश्यक त्या कागदपत्रासमवेत स्कॅन करून अपलोड करावीत.

- मक्तेदार काळया यादीत समावेश नसल्याचे प्रमाणपत्र.
- निविदा अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे नमुन्यातील प्रमाणपत्र.
- नमुना सत्यप्रतिज्ञापत्र ( रुपये ५०० च्या स्टॅम्पवर )
- मक्तेदाराचा बँक खाते क्र. बँकेचे नाव व शाखा, आय एफ एस सी कोड, संपर्क क्रमांक, ई मेल आय डी याची माहिती.

**ब) आर्थिक लिफाफा / लिफाफा क्र.२**

- ठेकेदारांनी आपले दर विहित BOQ मध्ये योग्य त्या जागी भरणा करून सदरची BOQ अपलोड करावी. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निविदेचे दर इतर कोठेही नमूद करू नयेत.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत** मांडवगण फराटा
**ता.**शिरूर,**जि.पुणे**

**सरपंच**
**ग्रामपंचायत** मांडवगण फराटा
**ता.**शिरूर,**जि.पुणे**



Signature Not Verified
Digitally signed by SAMIKSHA AKSHAY PHARATE
Date: 2026.05.18 16:54:36 IST
Location: Maharashtra-MH